# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ११ जुलै, २०२४ / आषाढ २०, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | उप मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (३) | गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री | |
| (४) | राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### राज्यात पंतप्रधान सूर्यघर वीज योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(१) * २३५१५ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सत्यजीत तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान सूर्यघर वीज योजनेच्या अंमलबजावणीमुळे घराच्या छतावर सोलार रुफ टॉप बसवून वीज उत्पादन करण्याचे प्रमाण वाढले असून, एकाच महिन्यात सोलार यंत्रणा बसविणाऱ्यांची संख्या कोट्यवधी पर्यंत गेली असून सोलार यंत्रणेसाठी पुरविण्यात येणाऱ्या इन्व्हर्टरची संख्या अपुरी असल्याने सोलार यंत्रणा बसविणाऱ्या नागरिकांना मेड इन इंडियाचे पुरेसे इन्व्हर्टर उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील ५ हजार ग्राहकांनी सोलर पॅनल बसविण्यासाठी या अनुदानाची मागणी करुनही संबंधित अनुदान प्राप्त झाले नाही, तसेच सुर्यघर योजनेच्या पोर्टलवर कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नसून दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी " ग्रीड कनेक्टेड रूफ टॉप ॲण्ड स्मॉल सोलर पॉवर प्लांटस प्रोग्राम " नावाने सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान सुर्यघर योजनेत देशातील एक कोटी कुटुंबांना महिन्याला ३०० वॅट पर्यंत मोफत वीज पुरवठा करण्याचा उद्देश असताना राज्यात सदर योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन किलोवॅटच्या प्रकल्पाकरीता सुरुवातीला ग्राहकाला रुपये एक लाख ६५ हजार रुपये एक रकमी गुंतवावे लागत असून, सदर रक्कम टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात येत असल्याने नागरिकांचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनामार्फत पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज या योजनेंतर्गत ३ ते १० किलोवॅट प्रकल्पासाठी रुपये ७८ हजार अनुदान देण्यात येत असून हे अनुदान अत्यल्प असल्यामुळे राज्य शासनाने या योजनेत वाटा उचलावा अशी मागणी राज्यातील विविध वीज ग्राहक संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेत नागरिकांचा सहभाग वाढविण्याकरीता तसेच या योजनेसाठी अधिकचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पंतप्रधान सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत घराच्या छतावर सोलर रुफ टॉप यंत्रणा बसविण्यासाठी आजपर्यंत १,७३,२७२ अर्ज पंतप्रधान सुर्यघर पोर्टलमध्ये नोंदणी झालेली आहेत. त्यापैकी ५६,८४६ ग्राहकांनी महावितरण पोर्टलवर अर्ज केला असून ४८,१२८ ग्राहकांनी महावितरणकडे प्रक्रिया फी भरणा केली आहे. या पैकी ११,७८८ ग्राहकांनी ४९.२२ मे.वॅ. क्षमतेचे सोलर रुफ टॉप यंत्रणा इन्व्हर्टरसहित बसविण्यात आलेली आहे. तसेच इन्व्हर्टर हा सोलर रुपटॉफचा एक भाग आहे.
(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यात पंतप्रधान सुर्यघर मुफ्त बिजली योजनेची व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यात आलेली असून एकूण २३,६६४ ग्राहकांनी पंतप्रधान सुर्यघर मुक्त बिजली योजना पोर्टल वर अर्ज करुन २,२४१ घरगुती ग्राहकांच्या घरावर ९.७८२ मेगा वॅट क्षमतेचे रुफ टॉप सौर यंत्रणा आस्थापित करण्यात आलेली आहे व संबंधित ग्राहकांना देय अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेद्वारे ग्राहकांच्या खात्यामध्ये जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

छतावर सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा आस्थापित करण्यापूर्वी ग्राहक व त्याच्या निवडीनुसारची नोंदणीकृत एजन्सी यांचेमध्ये परस्पर सहमतीने सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्याचे अटी व शर्ती बाबत लेखी कायदेशीर करारनामा अमंलात आणला जातो. एकूण प्रकल्प खर्चाची परस्पर सहमतीने ठरलेली पूर्ण रक्कम ग्राहकांनी एजन्सीला द्यायची आहे. तसेच छतावर सौर ऊर्जा प्रकल्प नियमानुसार समाधानकारकरित्या कार्यन्वित झाल्यानंतर केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेली देय अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेद्वारे ग्राहकांच्या खात्यामध्ये दिली जाते.
(४) अशा प्रकारची कोणतीच मागणी शासनास प्राप्त झालेली आढळून येत नाही.
(५) अधिकाधिक वीज ग्राहकांनी सौर ऊर्जेच्या वापराला प्राधान्य देण्यासाठी व या योजनेत सहभाग घेण्यासाठी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. प्रमुख वृत्तपत्रामधून या योजनेची प्रसिध्दी करण्यात आली आहे. तसेच महावितरणच्या सर्व घरगुती ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी मोबाईल लघु संदेश पाठविण्यात आला आहे. योजनेची संपूर्ण माहिती महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील १६६ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(२) * २३१४४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य नागरिकांची घर खरेदी करताना फसवणूक होऊ नये म्हणून राज्य शासनाच्या माध्यमातून महारेरा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत शेकडो प्रकल्प सुरु असून मागील २ ते ३ वर्षांपासून निधीची कमतरता व अनेक वेगवेगळया कारणांमुळे तब्बल १६६ प्रकल्प माहे ऑक्टोबर, २०२२ पासून प्रलंबित आहेत तसेच महारेराच्या नियमानुसार रहिवाशांना मुदतीत घरांचा ताबा देणे बंधनकारक असूनही मुंबईतील झोपडपट्टी भागात राहणाऱ्या हजारो रहिवाशांना हक्काचे घर मिळण्यास विलंब होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महारेराकडे नोंदणी झालेल्या प्रत्येक प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल दर तीन महिन्यांनी बांधकाम व्यावसायिकांनी प्राधिकरणाकडे सादर करणे बंधनकारक असताना अद्याप २१२ प्रकल्पांच्या विकासक/बांधकाम व्यावसायिकांनी महारेराने केलेल्या पाठपुराव्याला कुठलाही प्रतिसाद दिला नसल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महारेराकडे नोंदणी झालेल्या गृह प्रकल्पात गुंतवणूक करतांना ग्राहकांनी चौकशी करुन निर्णय घेण्याचे केलेले आवाहन म्हणजे संबंधित विकासक / बांधकाम व्यावसायिक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याऐवजी महारेरा प्राधिकरण हे आपली जबाबदारी टाळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतील वेगवेगळया कारणांमुळे प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची चौकशी करून सदर प्रलंबित असलेले १६६ प्रकल्प पूर्ण करण्याकरीता तसेच महारेरा प्राधिकरणाकडे प्रकल्पांच्या प्रगतीचा अहवाल सादर न करणाऱ्या २१२ प्रकल्पांच्या बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) १. १६६ प्रकल्प हे विकासकाकडे अर्थसहाय्य उपलब्ध होत नसल्याने रखडलेले आहेत. शासनाने घेतलेल्या धोरणात्मक उपाययोजना नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

I) सदर योजनांमध्ये कलम १३ (२) अन्वये विकासक निष्कासनाबाबत आजतागायत ९० प्रकरणांमध्ये निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार योजनेसबंधी पुढील परवानग्या जारी करण्यात येत आहेत. उर्वरीत प्रकरणांमध्ये कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

II) अभय योजनेंतर्गत गठीत केलेल्या समितीच्या वेळोवळी बैठका पार पडल्या असून १५ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये निर्णय होऊन शासनाचे कलम ३ के अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निदेश प्राप्त झाले आहेत. तद्नंतर अशा निदेश प्राप्त झालेल्या योजनांमध्ये वित्तीय संस्थाना सह-विकासक/ऋणदाता म्हणून मान्यता देऊन सुधारीत आशयपत्र जारी करण्यात येत आहेत.
III) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना संयुक्त भागिदारी तत्वावर राबविण्याकरीता एकूण १२ झोपडपट्टी पुनर्वसन योजना असून त्या योजना पूर्ण करण्याकरीता अंदाजपत्रक अहवाल तयार करून सदरच्या झोपु योजनांचे महामंडळे/प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्था यांना वाटप करणेकरीता शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरित प्रकल्प सुरु करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे.
२. महारेराने २१२ प्रकल्पांची यादी महारेरा संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. तसेच त्यांची बँक खाती गोठवण्याचे आदेश संबंधित बँकाना दिले असून, जिल्हा निबंधकांना त्यांचे प्रकल्पांतील सदनिका/गाळे नोंदणी न करण्याबाबत कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये लाखो रूपयांचे हेरॉईन जप्त केल्याबाबत

**(३) * २३६५२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (माहिम) येथील रहेजा उड्डाणपुलावर हेरॉईन विकणाऱ्या एका तरुणाला शाहूनगर पोलिसांनी अटक केली असून, सदर तरुणाकडून ५४ लाख रुपये किंमतीचे हेरॉईन जप्त करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने माहिमच्या रहेजा उड्डाणपुलावर हेरॉईन विकणाऱ्या संबंधित टोळी व मुख्य सुत्रधारांना अटक करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ३१/०३/२०२४ रोजी रहेजा ब्रिज सायन लिंक रोड, माहीम, मुंबई या ठिकाणी २७० ग्रॅम हेरॉईन (अंदाजे किंमत रुपये ५४०००००/-) हा अंमली पदार्थ विनापरवाना वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याने एका आरोपीवर शाहूनगर पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १०९/२०२४ कलम ८(क) २१ (क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली आहे.
दिनांक ०६/०४/२०२४ रोजी मा.न्यायालयाने आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावली असून आरोपीकडे त्याचे अंमली पदार्थ पुरवठादार बाबत पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आडीवली तमनाथ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील उल्हास नदीलगतच्या अनधिकृत बांधकामामुळे पूर परिस्थिती निर्माण होत असल्याबाबत

**(४) * २३२३४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडीवली तमनाथ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे उल्हास नदीलगत अनधिकृतपणे संरक्षण भिंतीचे बांधकाम व माती भरावाचे काम सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काँक्रिट भिंतीचे बांधकाम हे सर्व्हे नं.२९/१ मौजे तमनाथ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील उल्हास नदीच्या पूररेषा नकाशामध्ये पूररेषेच्या आत येत असून, सीआरझेड तसेच नव्याने करण्यात आलेल्या पूरनियंत्रण नियमांचे उल्लंघन करून होत असलेल्या सदर बांधकामामुळे व मातीच्या भरावामुळे पावसाळ्यात नदीचा प्रवाह बदलून परिसरातील गावात पुर परिस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी तसेच शेतीची वित्त हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आडीवली तमनाथ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे उल्हास नदीलगत संरक्षण भिंतीचे अनधिकृतपणे करण्यात आलेले बांधकाम बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये निदर्शनास आले होते.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर संधानक संरक्षण भिंत बांधकाम व भराव हा सर्व्हे नं. २९/१ नसून २९/२ मौजे तमनाथ ता.कर्जत, जि.रायगड येथे केलेला आहे. तसेच सदर बांधकाम हे निळी पूररेषेच्या आत (निषिध्द क्षेत्रात) आहे. त्यामुळे पुर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) संबधितांना क्षेत्रिय कार्यालयांमार्फत दिनांक ०३/०१/२०२४, दिनांक १४/०३/२०२४ व दिनांक २०/०३/२०२४ रोजी नोटीस देण्यात आलेल्या आहेत व दिनांक ०२/०४/२०२४ रोजीपासून सदर बांधकाम बंद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.वनदेव (ता.पातुर, जि.अकोला) येथे वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेंतर्गत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५) * २२९४५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वनदेव (ता.पातुर, जि.अकोला) येथील अतिदुर्गम भागात वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचे दिनांक १७ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वनदेव परिसरातील ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार शासनाने दहा लाख रुपयांचा निधी मंजूर करुन रस्त्याचे काम सुरु करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कंत्राटदार व शासकीय अधिकारी यांनी संगनमताने रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करून त्यावर काँक्रिटीकरण केल्याचे तसेच अधिकाऱ्यांशी संगनमत करुन दहा लाख रुपयांचा गैरव्यवहार करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी सदर कामाच्या ठिकाणी ग्रामस्थांनी मोर्चा काढून काम बंद पाडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी निकृष्ट दर्जाचे काम करुन गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेंतर्गत दिनांक ०५/०१/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौ.वनदेव (ता.पातुर, जि.अकोला) येथील तांडा वस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत जवळपास ४० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साल्पादेवी पाडा, मुलुंड (पश्चिम) (मुंबई) येथील साईकृपा को.ऑप.हौ.सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत

**(६) * २३९०० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साल्पादेवी पाडा, मुलुंड (पश्चिम) (मुंबई) येथील साईकृपा को.ऑप.हौ.सोसायटीच्या विकासासाठी झोपडपट्टी विकास प्राधिकरणाकडून सिद्धार्थ कन्स्ट्रक्शन या विकासकाची नियुक्ती करण्यात आली होती, परंतु सदरहू विकासकाने गत १५ वर्षांपासून उक्त प्रकल्पाचे काम पूर्ण केले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विकासकाने गत ५ वर्षांपासून साईकृपा को.ऑप.हौ.सोसायटीच्या झोपडपट्टीधारकांना देण्यात येणारे भाडे देखील थकविले असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झोपडपट्टीधारकांनी झोपडपट्टी विकास प्राधिकरणाकडे सिद्धार्थ कन्स्ट्रक्शन या विकासकावर कारवाई करुन नवीन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत वेळोवेळी मागणी करुनही संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे विकासकाशी आर्थिक संबंध असल्याने नवीन विकासकाची नियुक्ती करण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने सिद्धार्थ कन्स्ट्रक्शन या विकासकास काळ्या यादीत टाकून नविन विकासक नेमण्याबाबत व तक्रारी करुनही विकासकावर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे निलंबन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मुलुंड साल्पादेवी पाडा साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारत क्र. १ चे बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारतीला दिनांक ०८/०६/२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सदर योजनेत २८२ पात्र झोपडीधारक असून त्यातील २५० पात्र झोपडीधारकांना सदनिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच संयुक्त इमारत क्र. ३ चे आराखडे मंजूर करण्यात आलेले असून आरंभ प्रमाणपत्रासाठी अटींची पुर्तता न केल्याने अद्यापपर्यंत पुढील परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत.
(२) श्री.मधुकर धायगुडे व इतर १६ यांचे मार्च, २०२३ अखेरचे थकीत भाडे रुपये ७३,२६,८६६/- इतके होते. त्यानुसार विकासकाने दिनांक ०४/०६/२०२४ अखेर सदर झोपडीधारकांच्या खात्यावर एकूण रुपये ८७,२८,०००/- इतके भाडे जमा केलेले आहे. मे, २०२४ अखेर रुपये २५,७९,९८१/- इतके घरभाडे थकीत आहे.
(३) संयुक्त इमारत क्र.३ चे रखडलेले बांधकाम व थकीत भाडे प्रकरणी विकासक मेसर्स. सिध्दार्थ कन्स्ट्रक्शन कं. यांची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कलम १३ (२) अंतर्गत कार्यवाही करुन नियुक्ती रद्द करण्याबाबतची सुनावणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वस्तू व सेवाकर विभागातील पदे कमी केल्याबाबत

**(७) * २३४५२ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वस्तू व सेवाकर विभागातील शेकडो शासकीय पदे कमी केल्याने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरण्यात येणारी पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यात येणार असल्याने स्पर्धा परीक्षार्थींवर अन्याय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वस्तू व सेवाकर विभागात १२ हजार २५९ पदांपैकी ११ हजार १६७ पदे शासकीय असून उर्वरित १ हजार ९२ पदे बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या वस्तू व सेवा कर विभागाची (जीएसटी) पुनर्रचना करण्यात आली असून विविध संवर्गांमध्ये ५२२ नवी पदांची वाढ करुन ५१५ पदे कमी करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वस्तू व सेवा कर विभागातील रिक्त झालेली पदे कमी न करता नव्याने पदे निर्माण करून बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने न भरता स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये वस्तू व सेवा कर विभागाचा एकूण १२२५९ पदांचा आकृतिबंध (११५६३ नियमित पदे व गट ड संवर्गाची ६९६ बाहय यंत्रणेव्दारे घ्यावयाची पदे) निश्चित करण्यात आला आहे.
(३) होय. वस्तू व सेवा कर विभागास अनावश्यक असलेली ५१५ पदे कमी करण्यात आली असून आवश्यक असलेली ५२२ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. आकृतीबंधातील नियमित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरावयाची असून बाहययंत्रणेची पदे शासनाच्या धोरणानुसार भरावयाची आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (नवी मुंबई) येथील गृहनिर्माण प्रकल्पामध्ये नागरिकांनी गुंतविलेली रक्कम परत मिळण्याबाबत

**(८) * २३१११ श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईमधील तळोजा येथे गृहनिर्माण प्रकल्पाचे काम करणाऱ्या सुप्रिम कन्स्ट्रक्शन या कंपनीने १८०० सर्वसामान्य नागरिकांकडून एकूण ४०० कोटी रुपये जमा करुन लोकांची फसवणूक केल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये नागरिकांनी गुंतविलेली रक्कम परत मिळण्याकरीता व त्यांना त्यांचे घर उपलब्ध करुन देण्याकरीता तसेच फसवणुकीस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नवी मुंबई मधील तळोजा येथे सुप्रिम कन्स्ट्रक्शन कंपनीचे एकूण ९ प्रकल्प महारेराकडे नोंदणीकृत आहेत. या गृहनिर्माण प्रकल्पाबाबत महारेराकडे २२३ तक्रारी प्राप्त असून, ८० तक्रारींवर सुनावणी होऊन अंतिम आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेश महारेराच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उर्वरित १४३ तक्रारींवर सुनावणी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत

**(९) * २३४६२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये ४ टक्क्यांची वाढ केल्यामुळे महागाई भत्ता ५० टक्क्यांवर पोहोचला असून तो दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून लागू होणार आहे, केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता हा त्यांच्या वेतनासोबत थकबाकीसह मिळणार असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच धर्तीवर राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळा / महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून ४ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा व केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रवास भत्ता व घरभाडे भत्त्यामध्ये वाढ करुन सदर महागाई भत्ता थकबाकीसह अदा करण्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सर्वसाधारणपणे महागाई भत्ता मंजूरीबाबत केंद्र शासनाप्रमाणे धोरण अनुसरण्यात येते. त्यानुसार राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळा / महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील १ जानेवारी, २०२४ पासून ४ टक्के वाढीव महागाई भत्ता थकबाकीसह मंजूर करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) * २३६८३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाच्या विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून बेरोजगारांना व्यवसाय उभारण्यासाठी १० लाख रुपयांपासून ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील ६२० तरुणांनी सन २०२२-२०२३ मध्ये संबंधित पोर्टलवर नोंदणी केलेली असूनही बहुतांशी तरुणांना अद्यापि कर्ज उपलब्ध झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाज्योती, सारथी, बार्टी व टार्टी या संस्थांच्यावतीने तरुण बेरोजगारांना व्यवसाय उभारण्यासाठी ५० लाख रुपयांचे कर्ज देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने अनेक समाजांच्या आर्थिक महामंडळांची घोषणा केली असून या महामंडळामार्फत समाजातील होतकरु तरुणांना ५० लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करून सदर योजनांचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, अंशत: खरे आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाची सामाईक वेबप्रणाली आहे. या सामाईक वेबप्रणालीवर नागपूर येथे ६२० उमेदवारांनी नोंदणी केल्याचे सन २०२२-२३ मध्ये दिसून आले. सदर ६२० नोंदणीकृत उमेदवारांपैकी महामंडळाकडे १२३ लाभार्थ्यांची नोंद असून त्यापैकी १०० लाभार्थ्यांना बॅकेंने कर्ज मंजूर केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I) अंतर्गत रुपये १५ लाखाच्या कर्ज मर्यादेत तर गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत रुपये ५० लाखाच्या मर्यादेत लाभार्थी/ लाभार्थी गटांना व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील १२ टक्के च्या मर्यादेत व्याज परतावा संबंधित बँकेस अदा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या लिलावती रुग्णालयाच्या विश्वस्त मंडळाने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(११)** * **२४२३० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या लिलावती रुग्णालयाचे नवीन विश्वस्त मंडळ मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त करण्यात आले असून, सदर नवनियुक्त विश्वस्त मंडळाने कार्यभार हाती घेतल्यानंतर, कायदेशीर आणि सल्लागार शुल्काचे विस्तृतरित्या केलेल्या लेखापरिक्षणातुन १०० कोटींपेक्षा जास्त रक्कम वकील आणि सल्लागार यांच्यावर खर्च केल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फॉरेन्सीक ऑडीट दरम्यान ट्रस्टच्या निधीपैकी २०० कोटी रुपयांचा मंडळाने त्यांचे वैयक्तीक कायदेशीर समस्यांसाठी वकील आणि सल्लागारांसाठी गैरवापर केल्याचा तसेच कोविड महामारीच्या काळात न्यायालये बंद असताना सुमारे १०.७५ कोटी रुपये कायदेशीर बाबींवर खर्च केल्याचे दाखविल्यामुळे सदर प्रकरणात ५०० कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विश्वस्त मंडळाने, धर्मादाय आयुक्तांना त्यासंदर्भातील पुरावे सादर करुनही धर्मादाय आयुक्तांनी सदर प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने ५०० कोटीं रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १७९६५/२०२२ मध्ये दिनांक १८-०९-२०२३ रोजी दिलेल्या निर्देशानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त-५, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी दिनांक १४-१२-२०२३ रोजी पारीत केलेल्या सामाईक न्यायनिर्णय व आदेशानुसार विविध बदल अर्ज निकाली काढले आहेत.

लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टतर्फे विश्वस्त श्रीमती चारु किशोर मेहता यांनी लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करणारा अर्ज धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे क्र.३७/२०२४ अन्वये दाखल केला आहे.

सदर ट्रस्टतर्फे दाखल अर्ज क्र. ३७/२०२४ वर सुनावणी होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे सदर विशेष ऑडिट मधील मजकुराबाबत आजघडीला काहीही सांगता येत नाही. सध्या मा.सर्वोच्च न्यायालयाने विनाविलंब व तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिलेल्या काही पक्षकारांशी संबंधित इतर प्रकरणांची सुनावणी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेसमोर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर ट्रस्टतर्फे दाखल अर्ज क्र. ३७/२०२४ वर सुनावणी होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे सदर विशेष ऑडिट मधील मजकुराबाबत आजघडीला काहीही सांगता येत नाही.

(३) हे खरे नाही.

सध्या मा.सर्वोच्च न्यायालयाने विनाविलंब व तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिलेल्या लिलावती रुग्णालयाच्या काही पक्षकारांशी संबंधित इतर प्रकरणांची सुनावणी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेसमोर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० चे कलम-७४ नुसार धर्मादाय आयुक्त यांचे समोरील सर्व चौकशी व अपिल प्रकरणे ही न्याय चौकशी आहेत व ती कायद्यामध्ये नमुद तरतुदीनुसार चालविली जातात. या चौकशीमध्ये दोषी आढळल्यास संबंधितावर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई करता येते.

तसेच उक्त कायद्याच्या कलम -३३ व कलम-६९ नुसार एखाद्या सार्वजनिक न्यासाचे विशेष ऑडिट करण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्त देऊ शकतात. या तरतुदी अंतर्गत सदर ट्रस्टचे विशेष ऑडिट करण्याबाबत निर्णय प्रलंबित आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## पुणे अपघातातील अल्पवयीन मुलावर खटला चालविणेबाबत

**(१२) * २४२८५ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कल्याणीनगर जंक्शन परिसरात मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एका अल्पवयीन मुलाने बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीला धडक दिल्यामुळे दोघा निष्पाप नागरिकांचा गाडी खाली चिरडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १९ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अपघातानंतर संशयित कारचालकाऐवजी गुन्हेगार म्हणून निराळया व्यक्तीस दाखविण्याचा प्रयत्न झाला, तसेच मा.न्यायालयाने संशयित आरोपीस त्वरित जामीन दिल्यामुळे पोलिसांच्या तपास पध्दतीवर संशय व्यक्त केला गेला असून समाज माध्यमातून प्रचंड असंतोष व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संशयित आरोपी अल्पवयीन असून त्याला पुणे येथील दोन पब मध्ये बेकायदेशीररित्या मद्य विक्री करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून अपघातातील कारचा वाहन कर देखील भरला नसल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणात आरोपी अल्पवयीन मुलावर प्रौढ म्हणून खटला चालवावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांनी निरनिराळ्या माध्यमातून शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बेकायदेशीर मद्य विक्री करणारे पब, मद्यधुंद अवस्थेत कार चालविणारा अल्पवयीन मुलगा तसेच त्यांचे पालक यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर अपघातानंतर विधी संघर्षीत बालकाचे आजोबा यांनी पोर्शे कारचे चालक यांना सदरचा गुन्हा स्वतः केला असल्याचे कबूल करण्याकरीता धमकी दिल्याबद्दल आणि विधी संघर्षीत बालकाच्या वडीलांसोबत संगनमत करुन कारचालकास बेकायदेशीर लपवून ठेवण्याच्या उद्देशाने डांबून ठेवल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. त्यानुसार, विधी संघर्षीत बालक याचे आजोबा व वडील यांचे विरुध्द चालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन येरवडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३२२/२०२४, भा.द.वि. कलम ३४२, ३६५, ३६८, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे येथील कल्याणीनगर जंक्शन परिसरात घडलेल्या अपघाताच्या अनुषंगाने दाखल गुन्हयातील पोर्शे कारचालक विधी संघर्षीत बालकास दिनांक १९/०५/२०२४ रोजी मा.बाल न्यायालयासमोर हजर केले असता मा.बाल न्यायालयाने त्यास अटी व शर्तीवर जामिन मंजूर केला होता.सदर आदेशाविरोधात तपास अधिकारी यांनी मा.जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचेकडे केलेल्या अपील अर्जावरील आदेशानुसार पुन्हा मा.बाल न्यायालयाकडे अपील दाखल केल्यानंतर मा.बाल न्यायालयाने विधी संघर्षग्रस्त बालकाच्या ऑब्झर्वेशन कस्टडीस वेळोवेळी मुदतवाढ देत दिनांक २६/०६/२०२४ पर्यंत निरीक्षक गृहात ठेवण्याचे आदेशित केले होते. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५/०६/२०२४ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदरहू विधीसंघर्षित बालकाची निरिक्षण गृहातून मुक्तता केली असून विधीसंघर्षित बालकाचा ताबा त्याच्या पालकांकडे देण्यात आलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

प्रस्तुत गुन्ह्यातील विधी संघर्षग्रस्त बालकावर प्रौढ म्हणून खटला चालवावा अशी मागणी शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

(५) प्रस्तुत गुन्ह्याच्या अनुषंगाने विधी संघर्षीत बालक, त्याचे पालक, ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि अन्य कर्मचारी यांच्याविरुध्द येरवडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ३०६/२०२४ भा.द.वि. कलम ३०४, २७९, ३३८, ३३७, ३३८, ४२७,१२० (ब), २०१, २१३, २१४, ४६७, ४६६, ४६८, ४७१, मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९, १७७ व भ्रष्टाचार अधिनियम कलम ७, ७ (अ), १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधी संघर्षीत बालकाचे वडील यांनी त्यांच्या अल्पवयीन मुलाचे वाहन चालविण्याचे प्रशिक्षण झालेले नसून त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही हे माहित असताना त्यास पोर्श कार चालविण्यास दिली याबद्दल विधी संघर्षीत बालकाचे वडील यांच्याविरुध्द आणि हॉटेल कोझी व हॉटेल ब्लॅक क्लब या आस्थापनांमधील मॅनेजर व अन्य स्टाफ यांनी विधी संघर्षीत बालकाच्या वयाची खात्री न करता बेकायदेशीररिता मद्य व जेवण दिले याकरीता त्यांच्याविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३०७/२०२४ मोटार वाहन कायदा कलम ३, ५, १९९ (अ) बाल न्याय अधिनियम २०१५ कलम ७५, ७७ सह मुंबई दारूबंदी अधिनियम चे कलम १८ सह ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघातातील पोर्शे वाहनाचे मालक ब्रम्हा लेजर्स प्रा. लि. तर्फे विधी संघर्षीत बालकाचे वडील यांनी वाहनाची तात्पुरती नोंदणी करून पक्की नोंदणी करण्याची जबाबदारी असताना तसे न केल्याने, वाहनाची नोंदणी झालेली नसताना सदर वाहन अल्पवयीन मुलाच्या ताब्यात देऊन सार्वजनिक रस्त्यावर चालविण्यास दिल्याचे तसेच वाहनाचे मूळ मालक यांनी सदर वाहनाची वैध फी रुपये १,७५८/- ही न भरता शासनाचा महसूल बुडविल्याचे निष्पन्न झाल्याने गु.र.नं. ३०७/२०२४ यामध्ये स्टेशन डायरी नोंद क्र. २३/२०२४ अन्वये भादंवि कलम ४२० व मोटार वाहन कायदा कलम ५/१८०, १९९ (अ)(२), ३९/१९२ या कलमाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

येरवडा पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं.३०६/२०२४ या गुन्ह्याचे प्रकरण बेजबाबदारपणे, निष्काळजीपणे हातळल्याने येरवडा पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक दिनांक २४/०५/२०२४ रोजी पासून शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून याबाबत प्राथमिक चौकशी पूर्ण झाली असून नमुद प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी/अंमलदार यांचेविरूध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे.

तसेच सदर अपघाताच्या अनुषंगाने सखोल तपास करून (Proactively) गुन्ह्यांचा सुक्ष्मपणे तपास करून चांगले पुरावे निष्पन्न करून आतापर्यंत विधी संघर्षग्रस्त बालक व त्याची आई, वडिल, आजोबा, डॉक्टर, रक्त बदलण्यासाठी मदत करणारे, पब मध्ये मद्य देणारे मालक व मॅनेजर अशा एकूण १५ आरोपींना अटक करून त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील वसना उपसा सिंचन योजनेबाबत

**(१३)** * **२४३०५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील उत्तर पश्चिम भागातील दुष्काळी क्षेत्रात वसना उपसा सिंचन योजना सुरू करण्यात आली असून प्रचलित पाणी वाटपानुसार पूर्वी या सिंचन योजनेस ०.९२ अब्ज घनफूट पाणी उपलब्ध होत असताना जलसंपदा विभागाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार या सिंचन योजनेस अतिरिक्त ०.५२ अब्ज घनफूट पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेतील मूळ उपसा यंत्रणा ही सदोष असल्याने प्रत्यक्षात या सिंचन योजनेद्वारे पाणी वितरण करण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने कोटयवधी रूपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या या सिंचन योजनेचा नागरिकांना, शेतकऱ्यांना लाभ होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत धोम धरणाच्या डाव्या कालव्यातून वसना-वांगणा, जिहे-कटापूर व कवठे-केंजळ या योजनांसाठी पाणी उपसा करण्यात येत असून सदरहू स्वतंत्र उपसा यंत्रणा कार्यान्वित केल्यास वसना उपसा सिंचन योजनेंतर्गत उपलब्ध होणारे जवळपास १.४४ अब्ज घनफूट पाण्याचा उपसा करणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने उत्तर कोरेगाव तालुक्यातील वसना नदीच्या पूर्वेकडील १४ गावांचा वसना उपसा सिंचन योजनेत समावेश केल्यास या गावांमधील शेतकरी व नागरिकांनादेखील पाणी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, धोम धरणाच्या डाव्या कालव्यातून पाणी उपसा करण्यासाठी स्वतंत्र उपसा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत तसेच वसना नदीच्या पूर्वेकडील उर्वरीत १४ गावांचा या योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मूळ वसना उपसा सिंचन योजनेचा पाणीवापर ०.९२ अघफू व सिंचन क्षेत्र ४८६० हेक्टर इतके असून योजनेचा पहिला टप्पा मे,२०१३ (१५९८ हे. क्षेत्र) व दुसरा टप्पा फेब्रु,२०१८ (३२६२ हे. क्षेत्र) मध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे. त्यामुळे ४८६० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळत आहे.

(३) मूळ वसना उपसा सिंचन योजनेचा पाणीवापर ०.९२ अब्ज घनफूट इतका आहे. आता अतिरिक्त ०.५२ अब्ज घनफूट पाण्याचा वापर करणेसाठी स्वतंत्र उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. त्याकरीता सर्वेक्षण करण्यास मान्यता दिली आहे व निविदा कार्यवाही प्रगतीत आहे. त्यामुळे एकूण १.४४ अब्ज घनफूट पाण्याचा उपसा करणे शक्य होणार आहे.

(४) कृष्णा प्रकल्पाच्या फेर जल नियोजनास शासन निर्णय दिनांक ३०/०९/२०२३ अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर शासन निर्णयामध्ये वसना नदीच्या पूर्वेकडील १४ गावांच्या पाणीवापराचा समावेश नाही.

(५) धोम धरणाच्या डाव्या कालव्यातून अतिरिक्त ०.५२ अब्ज घनफूट पाण्याचा वापर करणेसाठी स्वतंत्र उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. वसना नदीच्या पूर्वेकडील उर्वरीत १४ गावांचा या योजनेत समावेश करण्याबाबत सद्य:स्थितीत कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

(६) वसना नदीच्या पुर्वेकडील उर्वरीत १४ गावांसाठी पाणी उपलब्धता नसल्याने स्वतंत्र उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे प्रस्तावित नाही.

-----------------

## राज्यातील पाणीपुरवठा संस्था व कृषी पंपधारकांना जलमापक यंत्राची सक्ती करून पाणीपट्टीमध्ये दरवाढ केल्याबाबत

**(१४) * २४३४३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाने पाणीपुरवठा संस्थांसह व्यक्तीगत कृषी पंपधारकांना जलमापक यंत्र बसविण्याची सक्ती केली असून, पाणीपट्टीत दरवाढ केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या ठोक जलशुल्क निर्धारणा सुधारणा आदेशानुसार शासनाने दिनांक ३० जून, २०२५ पर्यंत जुन्या पध्दतीने पाणीपट्टी भरणेसाठी दिलेली मुदतवाढ कायमस्वरुपी करुन जुन्या पध्दतीने पाणीपट्टी आकारण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दिनांक २९ मार्च, २०२२ च्या आदेशान्वये खाजगी उपसा सिंचन योजनांच्या लाभार्थ्यांना जलमापक यंत्रे बसविणे बंधनकारक केले होते. संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी / वैयक्तिक उपसा सिंचन धारकांची आकारणी क्षेत्राधारीत करावी, अशी तरतूद होती. मात्र सदर आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय करण्यात आलेली सवलत, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दिनांक ०२/०२/२०२४ च्या आदेशान्वये, दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत वाढविण्यात आली होती.

खाजगी उपसा सिंचन योजनांमध्ये पाणी उपसा करण्यापासून ते शेतापर्यंत पोहोचविण्याची पायाभूत सुविधा व सामग्री ही त्यांची वैयक्तिक खाजगी स्वरुपाची असल्याने प्रवाही सिंचनासाठीचे दर खाजगी उपसा सिंचन योजनेसाठी लागु केल्याने याबाबत खाजगी उपसा सिंचन लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, मा.लोकप्रतिनिधीं यांची मागणी आणि लोकभावना विचारात घेऊन, खाजगी उपसा सिंचन योजना पाणीपट्टी आकारणी व वसुलीच्या अंमलबजावणीमधील विविध अडचणी दूर करण्यासाठी खाजगी उपसा सिंचन योजनांकरीता स्वतंत्र क्षेत्राधारित दर देण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन आहे.

मात्र तोपर्यंत खाजगी उपसा सिंचन लाभार्थ्यांना दिलासा म्हणून शासनाने दिनांक २६/०६/२०२४ च्या पत्रान्वये, खाजगी उपसा सिंचन योजनेचे दर प्रवाही सिंचन योजनेच्या दराच्या अनुज्ञेय दराच्या अनुषंगाने आकारण्यास सद्य:स्थितीत स्थगिती दिली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विमुक्त जाती (अ) प्रवर्गाच्या यादीतील उपजाती मध्ये कैकाडी जात समाविष्ट करण्याबाबत

**(१५) * २४१९५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती (अ) या प्रवर्गाच्या यादीतील कैकाडी ही जात अनुक्रमांक (४) वर समाविष्ट असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या कैकाडी या मूळ जातीमधील उपजातीत धोंतले, कोरवा, कुंची कोरवी, माकडवाले, कोरवी, पामर इत्यादी जातीचा समावेश आहे परंतु कैकाडी या जातीचा उपजातीत समावेश /नामोल्लेख नसल्याचे शासन निर्णयानुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैकाडी ही मूळ जात असून सदर उपजातीमध्ये कैकाडी या शब्दाचा उल्लेख नसल्यामुळे कैकाडी जातीच्या मुलांना जात पडताळणीमध्ये, नोकरी साठी अर्ज करताना, महाविद्यालय मध्ये प्रवेश घेताना, मेडिकल, अभियांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी फॉर्म भारताना डी. बी. पोर्टलवर अनेक अडचणी येत असल्याने विमुक्त जातीच्या यादीतील अनुक्रमांक (४) मध्ये कैकाडी जातीचा शब्द समाविष्ट करण्यासाठी कैकाडी समाज संघ, कैकाडी युवक संघ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १/६/२०२३ रोजी वा त्या सुमारास तसेच अनेक वेळा राज्याचे मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री, बहुजन कल्याण मंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, सचिव, आयुक्त बहुजन कल्याण विभाग यांच्याकडे लेखी निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने कैकाडी समाजातील उमेदवारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने व कैकाडी या जातीच्या शब्दाचा उल्लेख उपजातीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २००८ च्या पत्रानुसार वि.जा.(अ) या प्रवर्गात अनु.४ वर मूळ जात कैकाडी असून, तत्सम जातीमध्ये अ) धोंतले ब) कोरवा क) माकडवाले किंवा कोंचीकोरवा ड) पामलोर इ) कोरवी या जातींचा समावेश आहे.

(२) कैकाडी समाज संघ यांचे दिनांक १७/२/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

अर्जदारास त्याच्या जात प्रमाणपत्रावर मुख्य जात अथवा तत्सम जात याचा जसा उल्लेख असेल त्याप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता अर्ज सादर करताना हवा तो जातीचा पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या घरी पोलीस शिपाई यांचा घरगडी म्हणून वापर होत असल्याबाबत

**(१६) * २३६५० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १२७ आयपीएस वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरी २९४ पोलीस शिपाई कर्मचारी यांना घरगुती सेवक म्हणुन नियुक्त केले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिसांना त्यांच्या पदाचे काम न देता या पोलीस शिपायांचा वरिष्ठ अधिकारी घरगुती सेवक म्हणून वापर करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व यासंदर्भात बेकायदेशीर प्रथा बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबईतील एकूण १२७ अति वरिष्ठ तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निवासस्थानी एकूण २९४ पोलीस शिपाई यांची बंगला सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र. DGP/६/ORDERLY/YARDSTICK/७०७/२००६, दिनांक २३/०८/२००६ अन्वये मुंबईसह राज्य पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या (भा.पो.से/म.पो.से.) कार्यालय व निवासस्थानी पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्याबाबत सर्व पोलीस घटकप्रमुखांना निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रकातील तरतुदीनुसार नियुक्ती करण्यात आलेले संबंधित पोलीस अंमलदार हे संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालय व निवासस्थानी उद्भवणारे शासकीय व निवासस्थानातील कामकाज पार पाडीत असतात.

मुंबईतील आयपीएस वरिष्ठ अधिकारी हे त्यांच्या निवासस्थानी नियुक्त पोलीस अंमलदारांना घरगडी म्हणून वापरत असल्याबाबत मुंबईतील कोणत्याही अशा पोलीस अंमलदारांकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून याबाबतची तक्रार किंवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाज्योती प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वैमानिक प्रशिक्षणार्थींना नोकरीची संधी गमाविण्याची परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(१७) * २४१५६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने तीन वर्षांपुर्वी ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणाची कमर्शियल पायलट ट्रेनिंग योजना आखण्यात आली असून त्यासाठी संचालनालय मंडळाने प्रति विद्यार्थी २५ लाख रुपये याप्रमाणे वीस विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी नागपूर उड्डाण क्लब सोबत करार झाला असून प्रशिक्षणाचे १८ महिने संपत आले असतानाही विद्यार्थ्यांचे उड्डाणाचे तास पूर्ण झालेले नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नोकरीची संधी गमाविण्याची भीती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीस विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी रूपये २५ लाख प्रमाणे नागपूर फ्लाईंग क्लबला पाच कोटी रुपये देणे असताना महाज्योतीने आतापर्यंत नागपूर फ्लाईंग क्लबला ७.५ कोटी रुपये म्हणजेच अधिकचे २.५ कोटी दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैमानिक सेवेसाठी उमेदवाराने २०० तासांचे व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असून वयाची अट २८ वर्षे असल्याने २८ वर्षांच्या वरील उमेदवारांना वैमानिक म्हणून निवडीची संधी फार कमी आहे यामुळे प्रशिक्षणार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचा आरोप स्टुडंन्ट राईट असोसिएशनने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर २० प्रशिक्षणार्थींवर कोणताही अन्याय होऊ नये यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नागपूर उड्डाण क्लब ही महाराष्ट्रातील एकमेव राज्य शासनाच्या मालकीची वैमानिक प्रशिक्षण संस्था असून CPL प्रशिक्षणाकरीता नागपूर उड्डाण क्लब आणि महाज्योती यांचेमध्ये दिनांक २६/०२/२०२१ रोजी करार झाला आहे. मात्र विद्यार्थ्यामध्ये नोकरीची संधी गमवण्याची भिती निर्माण झाली आहे ही बाब खरी नाही.
(२) नागपूर फ्लाईंग क्लबला त्यांच्या संरक्षणात्मक व्यवस्थमध्ये वाढ करणे तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक आणि प्रवेश क्षमता तयार करण्यासाठी रुपये २.५० कोटी तसेच प्रती प्रशिक्षणार्थी रुपये २५.०० लक्ष असे एकूण २० विद्यार्थ्यांसाठी रुपये ५.०० कोटी असा एकूण रुपये ७.५० कोटी इतका निधी सामजस्य करारानुसार देण्यात आला आहे.
(३), (४) व (५) महाज्योती प्रायोजीत प्रशिक्षणार्थ्यांचे उड्डाण प्रशिक्षण पुढील एक वर्षात पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येईल. जेणेकरुन त्यांना पुढील उच्च प्रशिक्षण किंवा नोकरीची संधी गमावयाची परिस्थिती निर्माण होणार नाही.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथील जीर्ण झालेल्या न्यायालयीन इमारतीच्या जागी नवीन न्यायालयीन इमारत बांधणेबाबत

**(१८) * २३८१३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (पश्चिम), मुंबई येथील महानगर दंडाधिकारी न्यायालय सन १९४५ मध्ये (सुमारे ७९ वर्षांपूर्वी) बांधलेल्या इमारतीमध्ये अद्यापही सुरु आहे, सदर न्यायालयाची इमारत जीर्ण झाली असून अनेकदा वेगवेगळया मजल्यांवरील छताचे प्लास्टर कोसळण्याचे प्रकार घडत असल्याची बाब शासनाने माहे एप्रिल, २०१७ रोजीच्या संरचनात्मक अहवालात नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक न्यायालयीन इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्याबाबत तेथील वकील संघटनांनी शासनाकडे सन २०२३ पासून वारंवार मागणी करुनही शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ६ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल व वन विभागाच्या अभिप्रायानुसार परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत मा.उच्च न्यायालयास या विभागाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला असून विभागाने काही मुद्दयांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कार्यकारी अभियंता, मुलुंड यांना विनंती करण्यात आली असून सदर माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या तहसिल कार्यालय, (कुर्ला) मुलुंड, मुंबई या इमारतीच्या तळमजल्यावर कोर्ट नं. २७ व महानगर दंडाधिकारी यांच्या चावडीमध्ये कोर्ट नं. ५३ ही दोन न्यायालये कार्यरत आहेत. सदरची इमारत ८० वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहे.

सदर इमारतीचे दिनांक २५/०३/२०१७ रोजी संरचनात्मक लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामध्ये सदर इमारत मोडकळीस आल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. तसेच इमारतीमध्ये काही ठिकाणी स्लॅब कोसळला असल्याचे तहसिलदार (कुर्ला) यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना लिहिलेल्या ४/८/२०२१ पत्रात नमूद केले आहे.
(२) मुलुंड येथील वकीलांनी न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत मागणी केलेली आहे हे खरे आहे. परंतु शासनामार्फत सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.
अ) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रान्वये मुंलुंड येथे न.भू.क्र.६७६ व ६७६ अ येथे नवीन स्वतंत्र न्यायालयीन इमारत (तळमजला + ११ मजले)(१६ कोर्ट हॉल) बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला असता, विभागाने त्रुटी उपस्थित केल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कार्यकारी अभियंता, मुलुंड यांना विनंती करण्यात आली आहे.
ब) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रामध्ये न्यायालय बांधण्याची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केले आहे. मुख्य महानगर दंडाधिकारी व तहसिल (कुर्ला) यांच्यामार्फत जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु होती. आता सदर जागा ५/४/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आलेली आहे.
क) सदर जागेच्या क्षेत्रफळानुसार न्यायालयीन इमारत बांधकामाचे नवीन आराखडे तयार करण्याचे काम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांनी आराखडे तयार केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अंदाजपत्रके तयार करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येतील मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात येणार आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रान्वये मुंलुंड येथे न.भू.क्र.६७६ व ६७६ अ येथे नवीन स्वतंत्र न्यायालयीन इमारत (तळमजला + ११ मजले)(१६ कोर्ट हॉल) बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर पत्रामध्ये न्यायालय बांधण्याची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केले आहे.

तद्‌नंतर मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ३० जून, २०२३ च्या पत्रान्वये जमीन हस्तांतरणाचे प्रकरण महसूल व वन विभागाकडे प्रलंबित असल्याने, त्याचा पाठपुरावा करण्याबाबत विधि व न्याय विभागास विनंती केली. त्यानुसार प्रस्तुत जमीन विधि व न्याय विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली

महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १७ जानेवारी, २०२४ च्या टिप्पणीन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या आरक्षण अभिप्रायानुसार न.भ.क्र. ६७६ अ पैकी ४३१७.०५ चौ.मी. आणि न.भू.क्र. ६६३ पैकी ३९.२६ चौ.मी. असे एकूण RPU ३.५ (कोर्ट) साठी आरक्षित ४३५६.३९ चौ.मी. क्षेत्र नियामनुसार विधी व न्याय विभागाकडे हस्तांतरीत करण्याकरीता विधी व न्याय विभागाने सदर क्षेत्रावर न्यायालयीन इमारत बांधणेसाठी प्रथम “प्रशासकीय मान्यता” द्यावी. विधी व न्याय विभागाने प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर, सदर जमिनीची (महसूलमुक्त) मागणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे परस्पर करावी.

महसूल व वन विभागाच्या वरील अभिप्रायानुसार परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत मा.उच्च न्यायालयास या विभागाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२४ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(४) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रान्वये मुलुंड येथे न्यायालयीन इमारत (तळमजला + ११ मजले)(१६ कोर्ट हॉल) बांधण्याकरीता रुपये ११४.५३ कोटी इतक्या किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तपासणीसाठी पाठविला असता, विभागाने काही मुद्दे उपस्थित केले. सदर मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कार्यकारी अभियंता, मुलुंड यांना विनंती करण्यात आली आहे. परंतु न्यायालयीन इमारत बांधण्याची जागा ५/४/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आलेली आहे. सदर जागेच्या क्षेत्रफळानुसार न्यायालयीन इमारत बांधकामाचे नवीन आराखडे तयार करण्याचे काम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे.

(५) शासनामार्फत सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे :-अ) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रान्वये मुंलुंड येथे न.भू.क्र.६७६ व ६७६ अ येथे नवीन स्वतंत्र न्यायालयीन इमारत (तळमजला + ११ मजले)(१६ कोर्ट हॉल) बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला असता, विभागाने त्रुटी उपस्थित केल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कार्यकारी अभियंता, मुलुंड यांना विनंती करण्यात आली आहे.

ब) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १६ एप्रिल, २०१९ च्या पत्रामध्ये न्यायालय बांधण्याची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केले आहे. मुख्य महानगर दंडाधिकारी व तहसिल (कुर्ला)

यांच्यामार्फत जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु होती. आता सदर जागा ५/४/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आलेली आहे.

क) सदर जागेच्या क्षेत्रफळानुसार न्यायालयीन इमारत बांधकामाचे नवीन आराखडे तयार करण्याचे काम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांनी आराखडे तयार केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अंदाजपत्रके तयार करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येतील मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात येणार आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१९) * २३४५० श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ४० लाख झोपडीधारकांना मोफत घर देण्याबाबत सन १९९५ पासून योजना राबविली जात असूनही झोपडीधारकांना अद्यापही हक्काचे घर मिळालेले नसल्याने मुंबईतील झोपडपट्टीधारकांनी राइट टू शेल्टर संस्थेच्या निवारा हक्क संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानात दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संकल्प मोर्चा काढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील वर्षानुवर्षे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडीधारकांना ५०० चौरस फुटाचे घर देण्यात यावे व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत असलेल्या जमिनीचे समान वाटप करण्यासंबंधीचा धोरणात्मक नियम पारित करावा जेणेकरून विकासकाला रहिवाशांची जमीन घेता येणार नाही आणि रहिवाशांचे पुनर्वसन होऊ शकेल तसेच साबळे नगर, कुर्ला, लाल डोंगर, चेंबूर येथील रेल्वे लगतच्या जमिनीवर मागील ५० ते ६० वर्षांपासून राहत असलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात यावे अशा मागण्या या झोपडीधारकांनी केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करुन प्रलंबित असलेले झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प राबवून रहिवाशांना न्याय मिळवून देण्याबाबत व उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना डिसेंबर १९९५ मध्ये झाली असून सदर प्राधिकरण बृहन्मुंबईतील झोपडपट्ट्यांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून काम करते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत आजमितीस एकूण १७५४ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना आशयपत्र निर्गमित करण्यात आले आहे. सदर १७५४ आशयपत्रानुसार योजनेतील झोपडीधारकांकरीता एकूण ४२३२३६ सदनिका, १६६२७१ प्रकल्पग्रस्तांकरीता सदनिका व २०८८३ कायमस्वरुपी संक्रमण शिबीर सदनिका बांधण्याकरीता मंजूरी देण्यात आली आहे.

आजपर्यंत एकूण २४९९५३ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देऊन झोपडीधारकांना कायमस्वरुपी स्थलांतरीत करण्यात आले आहे व ५३३४ संक्रमण शिबीर सदनिका बांधून शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.

(२) शासन धोरण विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील तरतुदीनुसार झोपडीधारकांना २७.८८ चौ. मी. चटई क्षेत्रफळाचे घर देय आहे.

विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या विनियम क्र.३३ (१०) च्या कलम १.११ नुसार केंद्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव स्वीकारण्यापुर्वी केंद्र शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. रेल्वे रुळालगतच्या झोपडपट्टीने व्याप्त बहुतांश जमिनी या केंद्र सरकारच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्याकरीता शासन मान्यतेनंतर तीन धोरणात्मक उपाययोजना नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

१) निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे,

२) अभय योजना राबविणे

३) मुंबई महानगर प्रदेशातील झोपडटपट्टी पुनर्वसन योजना अन्य महामंडळे/प्राधिकरणे/स्थानिक राज्य संस्था यांच्या संयुक्त भागीदारीत (JV) अन्वये राबविणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडा प्राधिकरणाने विविध शासकीय मंडळ / प्राधिकरणांना दिलेले २२०० कोटी रुपये परत करण्याबाबत

**(२०) * २३२२३ श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या निर्देशानुसार म्हाडा प्राधिकरणाने विविध शासकीय मंडळ / प्राधिकरणांना सुमारे २२०० कोटी रुपये दिले असून सदर पैसे आणि त्यावरील व्याजाची रक्कम वारंवार पत्रव्यवहार करुनही अद्यापपावेतो विविध शासकीय मंडळ / प्राधिकरणांनी म्हाडास परत केली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निर्देशानुसार म्हाडाने शिवशाही प्रकल्प, धारावी पुनर्वसन प्रकल्प, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि महाहौसिंग या प्राधिकारणांना पैसे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्राधिकरणांकडून म्हाडाचे पैसे परत मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) म्हाडा प्राधिकरणाने विविध शासकीय मंडळ/प्राधिकरण यांना रुपये २३०० कोटी इतका निधी दिला आहे.

(२) व (३) म्हाडा प्राधिकरणाने खालील शासकीय मंडळ/प्राधिकरणांना निधी उपलब्ध करुन दिला आहे :-

(रुपये कोटीत)

| अ.क्र | प्राधिकरण | दिलेला निधी (रुपये कोटीत) | म्हाडाला प्राप्त झालेला निधी | म्हाडाला येणे असलेली मूळ रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | शिवशाही पुनर्सवन प्रकल्प मर्यादित | ३०० | ८४.७२ | २१५.२८ |
| २. | महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ (महाहौसिंग) | २०० | ० | २०० |
| ३. | धारावी पुनर्वसन प्रकल्प | ५०० | ५०० | ० |
| ४. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | १००० | ० | १००० |
| ५. | महाराष्ट्र निवारा निधी स्थापनेसाठी दिलेला निधी | ३०० | ० | ३०० |
| | एकूण | २३०० | ५८४.७२ | १७१५.२८ |

या व्यतिरिक्त धारावी पुनर्वसन प्रकल्प व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडील रकमेवरील व्याजाची रक्कम अंदाजित रुपये ८०० कोटी इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांना वीज सवलत देण्याबाबत

**(२१) * २४२७३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांची वीज सवलत दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून बंद केल्याने उद्योगांचे महिन्याचे देयक प्रति युनिट दोन रुपयांनी महाग झाले असून दिनांक ३१ मार्चपूर्वी या उद्योगाला रुपये ९.५० प्रती युनिट दराने येणारे वीज देयक आता रुपये ११.३० प्रती युनिट करण्यात आले, तसेच पूर्वी रुपये ४९९ दराने मागणी शुल्क (डिमांड चार्ज) घेतले जात होते, त्यामध्ये वाढ होऊन रुपये ५४९ केले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना चालना मिळण्यासाठी वीजेची सवलत बंद करण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगाची वीज सवलत नियमित चालू आहे.
(२) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणाऱ्या वीजदर सवलत योजना दिनांक २९/०६/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली होती. सदर योजनेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत होती. शासनाने दिनांक ०५ मार्च,२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर योजनेस सन २०२४-२५ ते सन २०२६-२७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्याने लाच घेतल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(२२) * २४२५४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उद्योग सुरु करण्यासाठी तक्रारदार कंपनीने, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालयनालयाकडे रितसर अर्ज सादर करुन "ना-हरकत" प्रमाणपत्राची शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे "ना-हरकत"प्रमाणपत्र देण्यासाठी संचालनालयाच्या सहाय्यक संचालिका प्रसृती रजेवर असताना संचालनालयाचे संचालक यांनी तक्रारदाराकडे दीड लाख रुपयांची मागणी करुन दिनांक ६ मे, २०२४ रोजी रक्कमेसह नाशिक येथील संचालिका त्यांचे राहत्या घरी यावे, असेही यांना सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दरम्यानच्या काळात तक्रारदाराने त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून सहाय्यक संचालिका यांना दीड लाख रुपये रक्कम स्विकारतांना दिनांक ९ मे, २०२४ रोजी पकडल्याचे निदर्शनास येऊन सदर संचालक यांचा पोलीस शोध घेत असून त्यांचे मुंबईतील घर गोठवण्यांत आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) तक्रारदार यांनी जुन्या टायर पासून ऑईल बनविण्यासाठी एव्हरग्रीन कंपनी सुरु करण्यासाठी स्थानिक शेतकरी यांच्याकडून भाडे तत्त्वावर घेतलेल्या जमिनीचे मालक यांच्या नावाने पुरातत्व विभाग, नाशिक येथे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दिला असता आलोसे क्र.१, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार, सहायक संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालयनालय या प्रसुती रजेवर असताना त्यांनी तक्रारदार यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी स्वतःसाठी व संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालये संचालनालय यांच्यासाठी रुपये १,५०,०००/- लाचेची मागणी करुन दिनांक ०७/०५/२०२४ रोजी सदर लाचेची रक्कम त्यांच्या राहत्या घरी पंच व साक्षीदारांसमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले तसेच आलोसे क्र.१ यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत आलोसे क्र.२ यांना कळविले म्हणून लाचेची रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन व संमती दिल्याने दोन्ही आलोसे यांच्याविरुध्द इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.क्र. १४५/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग १९८८ चे कलम ७, ७अ, १२ प्रमाणे दिनांक ०८/०५/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी आलोसे क्र.२ हे गुन्हा घडल्यापासून अस्तित्व लपवित असल्याने आलोसे यांचा शोध घेण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथील अधिकारी व कर्मचारी यांना आलोसे क्र.२ यांचे मुंबई येथील राहते घर बंद मिळून आल्याने सील करण्यात आले आहे.

(४)

I. आलोसे तेजस मदन गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, मुंबई यांना पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये दिनांक १६/०५/२०२४ रोजी पासून शासन सेवेतून मानीव निलंबित करण्यात आले आहे.

II. आलोसे आरती आळे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार सहायक संचालक, नाशिक यांना पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १६/०५/२०२४ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

III. तसेच या प्रकरणी संबंधित दोन्ही आलोसे यांच्या मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

IV. तसेच आलोसे क्र.१ व आलोसे क्र.२ यांच्या राहत्या घराची घरझडतीमध्ये मिळून आलेली अनुक्रमे रुपये ३,१०,९००/- व रुपये ३,१८,०००/- इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहिगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अंतर्गत पाड्यांमध्ये वीज पुरवठा करणेबाबत

**(२३) * २४२४५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २२३४८ ला दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या तळवडा या आदिवासी पाड्यासह मनाचा आंबा, तुंबडे पाडा, कंपोल पाडा, पाई व शिसवली आदी १५० च्या आसपास असलेल्या पाड्यातील १ हजार ४०० हुन अधिक आदिवासी स्वातंत्र्यपूर्व काळापासून वीजपुरवठ्याअभावी अंधारात राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी पाड्यात वीज पुरवठा योजनेस शासनाने सन २०१६-१७ मध्ये मंजुरी दिलेली असून या योजनेसाठी ठेकेदाराने आणलेले पोल वायर व इतर साहित्य मागील सुमारे ६ वर्षांपासून दहिगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर पडून असून या योजनेच्या कामास आजमीतीस सुरुवातच झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेचे मागील ६ वर्षांपासून प्रलंबित असलेले काम पूर्ण करून वीज पुरवठा लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर वाडी-पाड्यांना पारेषण विरहीत सौर ऊर्जेव्दारे विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) व (३) सदरहु वाडी-पाड्यांना विद्युत पुरवठा करणेकामी महावितरणकडून संबंधित कामाचे अंदाजपत्रक मंजूर आहे. तसेच या कामास जिल्हा नियोजन समिती (DPDC) योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने महावितरणकडून कामास सुरुवात देखील करण्यात आली होती. परंतु विद्युत विभागाच्या पायाभुत सुविधा उभारण्यासाठी लागणारी जमीन ही वनविभागाच्या अखत्यारीत असल्याने त्या अनुषंगाने वन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. वन विभागाकडून सदर प्रस्तावास परवानगी मिळल्यानंतर महावितरण कंपनीमार्फत काम सुरु करण्यात येणार आहे.

तसेच, दहिगांव ग्रामपंचायत कार्यालयामार्फत सदर विद्युतीकरणाच्या कामास परवानगी मिळण्याकरीता वनविभागाकडे ३/२ चा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावातील वन विभागाकडून दर्शविण्यात आलेल्या तुटीची पुर्तता पूर्ण करुन घेण्यात आलेली आहे. तसेच सहाय्यक वनसंरक्षक, शहापूर यांच्या स्तरावर दिनांक २३/०९/२०२१ व दिनांक २१/०१/२०२२ रोजी ग्रामसेवक दहिगाव, कार्यकारी अभियंता, शहापूर (महावितरण), गट विकास अधिकारी,शहापूर व वन विभागाचे कर्मचारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत वन विभागाने राष्ट्रीय वन्यजीव मंडळास (NBWL) प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. सदर प्रस्ताव महावितरणमार्फत सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, याबाबत वन विभागाची परवानगी मिळताच महावितरणकडून सदरचे काम सुरु करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उंब्रज (जि.सातारा) परिसरातील गावांना तारळी धरणातील पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीबाबत

**(२४)** * **२४०५२ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंब्रज, (जि.सातारा) परिसरातील चोरे, चोरजवाडी, मरळी, धावरवाडी, सावरदर, भांबे गावांतील तारळी धरणातील पाणी शेतीच्या सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली असून पुनर्वसनाकरीता शासनाने जमिनी दिलेल्या असतानाही सदर शेतीच्या सिंचनासाठी व्यवस्था करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सहा गावांच्या शेतीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

तारळी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील सावरघर, ता.पाटण या गावातील पुनर्वसित लोकांना धावरवाडी व चोरे या गावांमध्ये जमिनी वाटप झालेल्या आहेत. त्यापैकी चोरे गावातील क्षेत्र हे पाल उपसा सिंचन योजनेच्या ५० मी. पर्यंतच्या लाभक्षेत्रामध्ये अंशत: येत आहे. तसेच तारळी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील भांबे, ता.पाटण या गावातील पुनर्वसित लोकांना वडगाव (उंब्रज), इंदोली, साबळेवाडी, गोडवाडी व शिरगाव या गावांमध्ये जमिनी वाटप झालेल्या आहेत. त्यापैकी वडगाव (उंब्रज), इंदोली, साबळेवाडी, गोडवाडी या गावातील क्षेत्र हे इंदोली उपसा सिंचन योजनेच्या ५० मी. पर्यंतच्या लाभक्षेत्रामध्ये अंशत: येत आहे.

चोरे गावातील उर्वरित क्षेत्र व धावरवाडी या गावातील शेतजमीन पाल उपसा सिंचन योजनेच्या ५० ते १०० मी. मधील प्रस्तावित योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये सिंचनाचा लाभ मिळणेसाठीचा प्रस्ताव आणि वडगाव (उंब्रज), इंदोली, साबळेवाडी, गोडवाडी या गावातील उर्वरित क्षेत्र शेतजमीन इंदोली उपसा सिंचन योजनेच्या ५० ते १०० मी. मधील प्रस्तावित योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये सिंचनाचा लाभ मिळणेसाठीचा महामंडळाचा प्रस्ताव शासनास तत्वत: मान्यतेसाठी प्राप्त आहे. सदर प्रकरणी शेरेपुर्ततेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर असून नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशीर प्रवेश केलेल्या परदेशी नागरिकांमुळे कारागृहांवर अतिरिक्त भार पडत असल्याबाबत

**(२५)** * **२३९४८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आणि विशेषत: मुंबई मध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या परदेशी नागरिक प्रवेश करित असून, त्यांना त्यांच्या मायदेशी पाठविण्याची प्रक्रिया क्लिष्ट असल्याने ती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना राज्याच्या ताब्यात ठेवणे बंधनकारक असून सन २०२३ मध्ये ३६७ हून अधिक व सन २०२४ मधील २ महिन्यांत ३९ परदेशी नागरिकांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदा प्रवेश करणाऱ्या परदेशी नागरिकांची संख्या मोठी असल्याने त्यांना ठेवण्यासाठी विशेष जागा उपलब्ध नसल्यामुळे ताब्यात घेतलेल्या परदेशी नागरिकांना पोलीस स्टेशन मधील दहशतवाद विरोधी पथकाच्या कोठडीत ठेवले जात असल्याने पोलिसांवर अतिरिक्त भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मुळातच कैद्यांच्या तुलनेत कोठड्या किंवा कारागृहे कमी असताना बेकायदेशीर स्थलांतर करणाऱ्या परदेशी नागरिकांचा अधिक बोजा कोठड्यांवर पडत असल्याने शासनाने अशा परदेशी नागरिकांना त्यांना मायदेशी परत पाठविण्यासाठी विशेष अटक केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२३ मध्ये एकूण १५२ व माहे जानेवारी व फेब्रुवारी २०२४ मध्ये एकूण ३७ विदेशी नागरिकांना बेकायदेशीररित्या भारतामध्ये प्रवेश केल्याने मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.
(२) बेकायदेशीररित्या वास्तव्य करीत असलेल्या विदेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आल्यानंतर प्रकरणपरत्वे त्यांच्यावर निर्बंधित आदेश जारी करुन सर्वसाधारणपणे संबंधित पोलीस ठाण्याच्या आवारातील पोलिसांच्या निगराणीखालील संरक्षित ठिकाणी ठेवण्यात येते.
(३) सध्या राज्यात मध्यवर्ती कारागृह, भोईवाडा, मुंबई येथे ८० विदेशी नागरिकांना स्थानबध्द करण्याच्या क्षमतेचे तात्पुरते स्थानबध्दता केंद्र स्थापन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच बाळेगाव, नवी मुंबई, जिल्हा ठाणे येथे २१३ विदेशी नागरिकांना स्थानबध्द करण्याच्या क्षमतेचे कायमस्वरुपी स्थानबध्दता केंद्र स्थापन करणे प्रस्तावित असून त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.